महापारेषण

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग,
प्रकाशगंगा प्लॉट सी-१९, ई-ब्लॉक ४ था मजला, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
Email : ciro@mahatransco.in website : www. mahatransco.in दूरध्वनी क्र. २६५९५०४३ / २६५९५०६४
C.I.N.No. U40109MH2005SGC153646

जा. क्र. मराविपाकं/का.औ.सं.क.वि/COVID-१९/सहाय्यता कक्ष/२१४६ दि. ६ एप्रिल, २०२१

# परिपत्रक - औ.सं. - ०१

**विषय :** COVID-१९ मुळे प्रभावित झालेल्या / होत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी सांघिक कार्यालय व परिमंडल कार्यालय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या 'COVID-१९' सहाय्यता कक्षासाठी अतिरिक्त सूचना

**संदर्भ :-** परिपत्रक क्र. मराविपाकं/का.औ.सं.क.वि/COVID-१९/कोसक/४४७९, दि. २९.१०.२०२०

राज्यामध्ये सुरू असलेल्या कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाचे गांभीर्य विचारात घेता महापारेषण कंपनीतील अधिकारी / कर्मचारी यांना दुर्दैवाने या विषाणूचा संसर्ग झाल्यास रुग्णालयात दाखल करण्यामध्ये तसेच उपचारा करीता लागणारे सहाय्य मिळवून देणे व वैद्यकीय वीम्याची सुविधा सुलभतेने उपलब्ध होणे या व अन्य तत्सम बाबींकरीता मुख्य कार्यालय तसेच सर्व परिमंडल कार्यालयांच्या स्तरावर कोविड-१९ सहाय्यता कक्षाची (COVID-19 Cell) स्थापना करण्यात आलेली आहे.

२. आता पुन्हा राज्यामध्ये कोविड-१९ च्या प्रादूर्भावाची तिव्रता वाढत असल्याकारणास्तव त्यावर मात करण्याकरिता सुव्यवस्थापनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. या विषाणूशी लढण्याकरीता राज्य शासनाच्या अखत्यारीतील संबंधित यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. या महामारीपासून आपल्या अधिकारी / कर्मचा-याचे रक्षण करण्याकरीता महापारेषणच्या व्यवस्थापनाने पुन्हा एकदा निश्चय केला असून त्या अंतर्गत या कोविड-१९ सहाय्यता कक्षाला अधिक कृतीशील करण्याचे ठरविले आहे. या संदर्भाने आता कोविड-१९ सहाय्यता कक्षाला खालीलप्रमाणे अतिरिक्त सुचना / निर्देश देण्यात येत आहेत.

१. महापारेषण कंपनीतील कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांस किंवा त्यांच्या कुटुंबियांना COVID-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांना रुग्णालयामध्ये खाटा (Bed) उपलब्ध होत नसल्यास किंवा गृह-विलगीकरणाची योग्य सोय होत नसल्यास अशा व्यक्तींना कंपनीच्या त्याच अथवा जवळच्या वसाहतीमधील रिक्त असणाऱ्या निवासस्थानांची उपलब्धता करुन देण्यात यावी. कंपनीच्या वसाहतीमधील निवासस्थाने सुस्थितीत नसल्यास त्यांची तात्काळ डागडुजी करुन काही निवासस्थाने तातडीची बाब म्हणून पुढील आदेश होईपर्यंत गृह-विलगीकरणासाठी राखीव करुन घेण्यात यावीत. या करीता निवासस्थान वाटपाचे अधिकार ज्या अधिका-याकडे निहित असतील असे सर्व अधिकारी या कोविड-१९ सहाय्यता कक्षाला सक्रीयपणे सहकार्य करतील.

२. सदर निवासस्थानांचे वाटप हे ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत येत असेल अशा अधिका-यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून गृह-विलगीकरणात असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबिय यांच्या विलगीकरणाच्या कालावधीतील खानपानाची यथायोग्य व्यवस्था कंपनीच्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याच्या विनंतीनूसार करुन देण्याबाबत सहकार्य करावे.

३. गृह-विलगीकरणासाठी आवश्यकता भासल्यास अतिरिक्त सोय म्हणून महापारेषण कंपनीच्या नजीकच्या विभागिय प्रशिक्षण केंद्रांचा तसेच तेथील प्रशिक्षणार्थ्यांसाठी राखीव असलेल्या निवासस्थानांचा देखील वापर करण्यात यावा.

४. COVID-१९ मुळे बाधित झाल्यामुळे कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांची गैरसोय होणार नाही याची दक्षता कोविड-१९ सहाय्यता कक्षामध्ये कार्यरत असणाऱ्या सदस्यांनी घ्यावी.

५. सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना (मुख्य अभियंता - परिमंडल कार्यालय) विनंती करण्यात येते की, कोविड-१९ सहाय्यता कक्षाच्या (COVID-19 Cell) कार्याची माहिती घेऊन त्याचा गरजेनुसार आढावा घेण्यात यावा. तसेच कोविड-१९ कक्षाला लागणारी संसाधने त्यांना प्राप्त करुन देण्यात यावीत. सांघिक कार्यालय स्तरावर नियंत्रण अधिकारी म्हणून मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांनी आढावा घ्यावा.

सदरील कक्षाला यशस्वी करण्याचे व पर्यायाने आपल्या अधिकारी / कर्मचा-यांचे आरोग्य जपण्याची जबाबदारी ही आपल्या सर्वांची आहे, याची जाणीव प्रत्येक अधिकारी / कर्मचा-यांनी ठेवणे आवश्यक आहे. वरील सुचना ह्या संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांच्या व्यतिरिक्त अतिरिक्त सुचना आहेत. तरी या सर्व सुचनांची उचीत अंमलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रक कंपनीच्या सिंहद्वारावर (ep.mahatransco.in) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्याची प्रत पोष्टाने पाठविण्यात येणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

06/08/2021

(सुगत गमरे)
कार्यकारी संचालक (मासं) (प्रभारी)

प्रति,
महापारेषण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाच्या सर्व अधिका-यांना माहितीस्तव.